Review Of Research
ISSN 2249-894X

Impact Factor : 3.1402(UIF)
Volume - 4 | Issue - 12 | Sept - 2015

# राजर्षी शाहू छत्रपती आणि सत्यशोधक चळवळ




**प्रा. बालाजी गंगावणे**
**विभाग प्रमुख, इतिहास , माऊली महाविद्यालय, वडाळा, ता. उ. सोलापूर जि. सोलापूर.**

**प्रस्तावना : -**

भारतीय समाजात समता, स्वातंत्र्य व बंधुता प्रस्थापित व्हावी म्हणून या महापुरुषांनी आपले सर्व आयुष्य पणाला लावले त्यामध्ये महात्मा ज्योतिराव फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य फार मोलाचे आहे. म्हणून त्यांना केवळ देशपातळीवरच नव्हे तर विश्वपातळीवर मान्यता लाभत आहे. थोर पुरुषांच्या चरित्रात वादग्रस्त स्थळे नाहीत असे सहसा घडत नाही. शाहू महाराजांचे चरित्र्य ही त्यास अपवाद नाही. त्याच्या चरित्राच्या अभ्यासक्रमात अनेक वादाचे पडसाद उमटत राहिले. छत्रपती शाहू महाराज हे आर्य समाजी होते की? सत्यशोधकी होते? हा वाद यापैकीच एक प्रमुख होय.



**शाहू छत्रपती सत्यशोधक नव्हते. (?)**

महाराष्ट्रातील काही पुरोगामी विचारवंताना महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बरोबरीने शाहू महाराजांचा उल्लेख करणे कमीपणाचे वाटते. त्यामुळेच काही विचारवंत हे शाहू छत्रपती सत्यशोधक विचाराचे नव्हते असे मानतात. त्यांनी सत्यशोधक समाजाची चळवळ उचलून धरली नाही. तर उलट त्यांनी केवळ आर्य समाजालाच आपला पाठिंबा दिला असा विचारही काही मंडळी सातत्याने मांडत असतात. शाहू महाराज हे सत्यशोधक विचाराचे नव्हते असे ठाम मत व्यक्त करणारे जे प्रमुख विचारवंत आहेत त्यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, य.दि. फडके, स.मा.गर्गे, नलिनी पंडीत इत्यादीचा विशेष उल्लेख करता येईल. लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मते "छत्रतपती शाहू महाराजांनी आर्य समाजाच्या तत्वानाचा प्रसार करण्यात पुढाकार घेतला." य.दि. फडके यांच्या मतानुसार एकेकाळी महाराष्ट्रात रानडे टिळक- सावरकर असा मंत्र जपला जात होता. गेल्या वीस पंचवीस वर्षात फुले-शाहू-आंबेडकर असा नवा मंत्र म्हणणारे महाराष्ट्रातील साकीय भटजी मतदारांना हातोहात बनवित असतात. शाहू महाराजांचय संदर्भात ते लिहीतात, 'सत्यशोधक -ब्राम्हणेत्तर चळवळ' असा शब्दप्रयोगही सरसकट वापरला जातो. हा शब्द वापर करणा-यांना शाहू महाराज हे सत्यशोधक होत असे वाटते. एवढेच नव्हे तर सत्यशोधक चळवळ आणि ब्राम्हणेत्र चळवळ यांच्यातील स्वरुप ही या नव्या साकीय भटजींना नीटसे माहित नसते. स.मा. गर्गे म्हणतात की, " महाराष्ट्रात असा एक समा आहे की, शाहू महाराजांनी महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजापासून प्रेरणा घेऊन त्यांचेच कार्य पुढे चालविले. महाराजांच्या सामाजिक व धार्मिक विचारांची बैधक सत्याशोधक समाजाच्या विचारापासून तयार झाली होती. ही विधाने वस्तुस्थितीशी किती जुळणारे आहेत आणि सत्यशोधक समाजाच्या लोकांनी आपल्या राजकीय सोयींसाठी किती निर्माण केलेली आहेत याची चिकित्सा होणे आवश्यक आहे. " नलिनी पंडीत लिहीतात की, "महात्मा फुले यांच्या काळात सत्यशोधक चळवळीचे पुढारीपण पुण्यातील सुशिक्षीत ब्राम्हणेत्तर मध्यमवर्गाकडे होते, शाहू छत्रपतीच्या नेतृत्वाखाल मराठी जमिनदार व जहांगीरदार वर्ग तिच्यात सामिल झाला. मध्यमयुगीन समाज व्यवस्थेकडे या वर्गाचा ओढा होता. वैद मंत्राच्या आग्रहाने जुन्या कर्मकांडाला जीवनदान मिळाले. आणि बहुजन समाजाचे धार्मिक आन कायम राहिल्याने ब्राम्हण नाहीसा झाला, तरी पुरोहितांची उचलबांगडी झाली नाही. प्रत्येक जातीची स्वतंत्र वसतिगृहे, स्वतंत्र उपाध्याय, या माध्यमातन जातीभेदाला खतपाणी देहवादांची जोड मिळाली नाही. " १९९० मध्ये प्रकाशित झालेल्या कोल्हापूर जिल्हा गौटीयरचे संपादक कि.का. चौधरी हे लिहीतात. "शाहू महाराज सर्वांनाच अल्प मदत करु लागले. परंतु कालांतराने वेद प्रामाण्यवादी महाराजांनी सत्यशोधक समाजास उत्तर दिलेच नाही. परंतु सत्यशोधकांशी त्याचे तीव्र मतभेद होऊन भाऊराव पाटी व अण्णासाहेब लठ्ठे या तरुण साधकास कोल्हापूरातून परागंदा व्हावे लागले. " राजर्षी छत्रपती शाहू आर्य समाजाचे चाहते होते. त्यांना सत्यशोधक चळवळ मान्य नव्हती. असे आग्रहाने प्रतिपादन करणारी वरील ज्येष्ठ विचारवंत मंडळी काही पुरावे सादर करतात. त्यात १० नोव्हेंबर १९१८ रोजी शाहू महाराजांनी कामगाराच्या जाहिर सभेत केलेल्या भाषणाचा उल्लेख करतात. महात्मा फुले व

शाहू छत्रपती या दोघांचीही हिंदूच्या पवित्र ग्रंथाबद्दलची भूमिका परस्पर विरोधी होती. महात्मा फुले आपल्या ग्रंथातून वेदावर सातत्याने जोरदार हल्ले चढवित होते. वेद हेच भेदाचे कारण आहे असे ज्योतिराव मानतात. तर शाहू महाराज हे वेदांचे चाहते होते आणि वेदातील विचारांचा प्रसाद करु इच्छित होते त्यामुळे महात्मा फुले यांच्या परंपरेत शाहू महाराजांना स्थान नाही असा ही एक विचार प्रवाह होता. याशिवाय वरील मंडळीना फुले आणि शाहू विचारात भिन्नता आढळते. महात्मा फुले यांनी देव आणि मानव यांच्या मधील दलाल (मध्यस्थ) काढून टाकण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली, तर या उलट शाहू महाराजांनी क्षात्रागतगुरुपीठांची स्थापना करुन शेंडीवाल्या भटजी ऐवजी शेमलेवाले नवे भटजी निर्माण करुन त्यांनी महात्मा फुले यांचा मूलभूत विचार मारुन टाकला. हे या दोघांमधील भिन्नतेचे विचार सांगून शाहू महाराज हे सत्यशोधक नव्हते असे प्रतिपादन केले जाते.

### कोल्हापूरात सत्यशोधक समाजाची स्थापना -

सत्यशोधक समाजाशी शाहू छत्रपती यांचा प्रथम संबंध केव्हाआला हे इतिहासाला जात नाही. परंतु सत्यशोधक समाजाचे एक प्रमुख नेते व महाराजांचे सहकारी भास्करराव जाधव यांना या चळवळीची कोल्हापूरात ११ जाने. १९११ रोजी श्री. भास्करराव जाधव यांच्या पुढाकाराने सत्यशोधक समाजाची स्थापना करण्यात आली. उपाध्यक्ष म्हणून अण्णासाहेब लठ्ठे तर सर्वाधिकारी म्हणून राव बहादूर डोंगरे व सेक्रेटरी म्हणून हरिभाऊ चव्हाण यांची नेमणूक करण्यात आली. सत्यशोधक समाजाच्या स्थापनेची प्रेरणा ही छत्रपती शाहू महाराजांचीच होती. कोल्हापूरात १९११ ला सत्यशोधक समाजाची स्थापना झालेली असली तर सत्यशोधक कार्याची सुरुवात महाराजांनी पुर्वीपासूनच सुरु केल्याचे आपल्याला दिसून येते. त्यांचा रायाभिषेक झाल्यानंतर एक दोन वर्षातच त्यांनी शासन व्यवस्थेतील ब्राम्हणी वर्चस्वाला शह देण्यास आरंभ केला त्यामधूनच भास्करराव जाधव, दाजीराव विचारे, रघुनाथराव सबनीस इत्यादी ब्राम्हणेत्त्र व्यक्तीस आपल्या शासन व्यवस्थेत महाराजांनी महत्त्वाची पदे दिली होती. महात्मा फुले यांच्या मृत्यू नंतर सत्यशोधक समाजास कोणी वाली उरला नाही ही चळवळ दिशाहीन होऊन त्यात वेगळा गट निर्माण झाली त्या गटाने सत्यशोधन समाजातील बहूजन समाजाला बहिष्कृत करण्याचा प्रयत्न चालविला. १५ सप्टेंबर १८९५ रोजीच्या पुण्यातील सत्यशोधक समाजाच्या सभेला महार, मांग, ढोर, चांभार यांना प्रवेश नाकारला होता.

### शाहू महाराजांचे सत्यशोधक समाजाला सहाय्य -

वेदोक्त प्रकरणानंतर छत्रपतीचा ओढा जास्तीत जास्त सत्यशोधक समाजाकडे लागला होता. एवढेच नव्हे तर शाहू महाराजांनी महात्मा फुले यांच्या सत्यशोधक विचार प्रणालीनुसार प्रत्यक्ष कार्य करुन आपण फुले यांचे खरे खुरे वारसदार आहोत हे सिध्द केले होते. शाहू महाराजांनी सत्यशोधक समाजाची तत्त्वे आपणास कशी मान्य आहेत हे सांगून आपल्या अनेक भाषणातून खाजगी संभाषणातून महात्मा फुले यांच्या संबंधीत आदर व्यक्त केला होता. त्या संबंधीचे अनेक पुरावे उपलब्ध आहेत. ते स्पष्टपणे मांडणे गरजेचे आहे कारण महाराष्ट्रातील काही विचारवंत शाहू छत्रपतींना सत्यशोधक विचाराचे मानत नाहीत. ते या पुराव्याचा विचार न करताच आपले विचार मांडतात. या उलट वि.भि. कोलते, रा.ना. चव्हाण, डॉ. रमेश जाधव यांच्या सारखे संशोधक महात्मा फुले यांची सत्यशोधक चळवळ शाहू छत्रपतींनी मोठ्या जिद्दीने पुढे नेली. तेच महात्मा फुले यांचे अखेर खरे खुरे वारसदार होते. हा विचार मांडताना दिसतात. शाहू चरित्रसाधनांचा शोध घेतल्यास अनेक पुरावे हाती लागले ते असे-

१) सत्यशोधक समाजाचे कार्य अधिक जोमाने व्हावे म्हणून विठ्ठल बिराजी डोणे यांची संस्थानाकडील खाजगी नोकरी १९११ मध्ये शाहू महाराजांकडून माफ करण्यात आली होती.

२) सत्यशोधक समाजाचे नेते बाबुराव यादव यांना सत्यशोधक समाजाच्या कामासाठी १७ डिसेंबर १९१७ पासून २ महिन्यांची राजा छत्रपतींनी मंजूर केली होती.

३) १५ ऑगस्ट १९२० ला सत्यशोधक समाजासाठी १५०० रु. देणगी देण्याचे आदेश शाहू महाराजांनी दिले होते.

४) शाहीर लहिरी हैदर आणि त्यांच्या शिष्यांना सत्यशोधक समाजाची भाने म्हणतात म्हणून त्यांना इमारत बांधण्यासाठी मोफत जागा व इतर बांधकामाचे साहित्य देण्याची छत्रपतीची ३० ऑक्टोबर १९२१ ची आजा आढळते.

५) सत्यशोधक चळवळीचे एक कार्यकर्ते आणि 'देशाचे दुश्मन' या ग्रंथाचे लेखक दिनकरराव चळवळकर यांना 'तरुण मराठा' 'जय भवानी' आणि 'भवानी तलवार' ही पत्रके काढण्यास छत्रपतींनी मदत केली. तसेच महाराजांची अनेक भाषणे व पत्रावरुन ही ते सत्यशोधक विचाराचे होते हे सिध्द होते.

६) २० ऑगस्ट १९२० रोजी रायबागहून शाहॅ छत्रपतींनी ॲडम नावाच्या इंग्रज अधिका-याला जे पत्र लिहीले त्या पत्रात आपणास सत्यशोधक समाजाची तत्त्वे मान्य असल्याचे ते सांगतात.

### शाहू छत्रपती आणि क्षात्रजगदगुरुपीठ -

शाहू महाराजांनी खूप विचारांती १२ ऑक्टोबर १९२० रोजी गारगोटीजवळील पाटगावा येथील मौनी महाराज यांच्या गादीवर सदाशिवराव लक्ष्मण पाटील या तरुणाची 'क्षात्रागदगुरु' म्हणून नेमणूक केली. क्षात्रागदगुरु पाटील हे सत्यशोधक विचाराचे होते. अशी खंडेराव बागल यांची नोंद आहे. महात्मा फुले यांनी देव आणि मानव यांच्या मधील भटजी काढण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली परंतु शाहू

महाराजांनी क्षात्रागदगुरुपीठ निर्माण करुन फुले यांचा सत्यशोधकी विचार मारुन टाकला अशी टिका त्यांच्यावर केली जाते. परंतु त्यात काही तथ्य नाही. जोतीरावांनी प्रथम पुरोहित शाहीवर हल्ल चढवून शुद्राविशुद्र व बहूजन समाजाला त्यांच्या धार्मिक गुलामगिरीतून मुक्त करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी मध्यस्थ नको म्हटले तरीही देवाचे अस्तित्व नाकारले नाही. त्याऐवजी त्यांनी 'निर्मिक' हा शब्द वापरला देव आणि मानव यांच्यामधील दलाल परोहित वर्ग एकदम नष्ट करणे शक्य नाही याची जाणीव महाराजांना झाली होती. म्हणूनच ते शुद्र सांगतात. हे जाणीवपूर्वक इथे लक्षात घेतले पाहिजे. शाहू छत्रपतींनाही देव आणि मानव यांच्यातील मध्यस्थ दलाल मान्य नव्हते परंतु बहुजन समाजाला एकदम पटणे शक्य नव्हते. म्हणून त्यांनी प्रथम क्षात्रागदगुरु या पदाची मराठा समाजासाठी वेगळी चूल मांडण्याचा प्रयत्न केला. ते पायरी-पायरीने सर्व हालचाली करीत होते. असा विचार खंडेराव मांडतात. थोडक्यात, शाहू छत्रपती हे महात्मा फुले यांचा पुराहित वर्चस्वाविरुध्दचा लढा निश्चितच पुढे चालवित होते. परंतु त्याच्या संयमी स्वभावानुसार ते सर्व परिवर्तने टप्प्या टप्प्याने करु इच्छित होते. तेव्हा ब्राम्हण मध्यस्थी शिवाय धार्मिक विधी व विवाह घडू लागले तेव्हा भटजी लोकांनी अशा विवाह विरुध्द कोर्टात खटले चालू केले. अशा प्रकारच्या खटल्यात लोकांची वकिली करण्यासाठी शाहू छत्रपतींनी स्वःखर्चाने वकिलांची व्यवस्था केली होती. शाहू छत्रपती आणि महात्मा फुले यांच्या विचारप्रणालीत विग्रह निर्माण करणारी बाब म्हणून शाहू छत्रपतीच्या क्षात्रागदगुरु निर्मिती कडे पाहणे केव्हाही अयोग्य ठरेल.

### सत्यशोधक आणि ब्राम्हणोत्तर चळवळ-

महाराष्ट्रातील विचारवंताचा एक गट असे सातत्याने प्रतिपादन करीत असतो की, "महात्मा फुले यांचा स्वातंत्र्य समता आणि बंधुत्त्वाचा सत्यशोधकी पुरोगामी विचार शाहू छत्रपतींनी पुढे चालविला नाही. या दोघांच्या विचारात जमिन आसमानचे अंतर आहे महात्मा फुले यांची सत्यशोधक चळवळ आणि शाहू महाराजांची ब्राम्हणेत्तर चळवळ ही दक्षिण आणि उत्तर ध्रुवासारखी दोन टोके आहेत. महात्मा फुले आणि शाहू महाराज हा वैचारिक समास नसून तो वैचारिक विग्रहच आहे. "

सत्यशोधक आणि ब्राम्हणेत्तर चळवळ ह्या दोन चळवळीत पूर्ण विरोधी चळवळी आहेत. आणि त्यामध्ये ब्राम्हणेत्तर चळवळ ही महात्मा फुले यांच्या जाती संस्था नष्ट करण्याच्या मुलभुत विचाराशी बेईमान असून ती जातीसंस्था अधिक घट्ट करणारी प्रतिगामी चळवळ आहे. असे विचार लोकमान्य टिळक मांडतात. तथापि, सत्यशोधक चळवळ ही ब्राम्हणेत्तर चळवळीची जननी आहे. या संबंधी जराही संदेह ठेवण्याचे कारण नाही आचार्य जावडेकर, न.र. फाटक, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी या ज्येष्ठ विचारवंतानी ब्राम्हणेत्तर चळवळीचे स्वरुप आणि कार्य नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यादोन वेगळ्या मानण्याचे कारण नाही.

### सत्यशोधक समाजाचे संबंध का तोडले?

छत्रपती शाहू महाराज कर्नल वुडहाऊस यांना पत्र लिहून कळवितात, 'मी सत्यशोधक समाजाचा नाही माझे त्यांच्याशी कोणतेही संबंध नाहीत ' असे ते सांगतात. १९१४ च्या जानेवारी महिन्यात एडवर्ड बादशहाच्या पुतळ्याला डांबर फासले गेले व त्यामुळे या भानगडी निर्माण झाल्या त्यात हे संपूर्ण वर्ष व त्यानंतरही काही काळ महाराजांना खूप मानसिक त्रास झाला. या डांबर प्रकरणात ब्रिटीशांना सत्यशोधक कार्यकर्त्यांच्या संशय होता त्यामुळे जाधव, लठ्ठे, डोंगरे यांना या समाजाचा राजीनमा द्यावा लागला. कोल्हापूर व बाहेरील प्रदेशात ब्राम्हणशाहीवर सत्यशोधक हल्ले चढविले. थोडक्यात, सत्यशोधक प्रचार जलशाचा जोर वाढलेला होता त्यामधून ब्राम्हण व ब्राम्हणेत्तर दंगली वाढल्या होत्या या सर्व घटनामुळे व दंगलीमुळे ब्रिटीशसरकारचे महाराजांवर दडपण आले. ब्राम्हणवृत्तपत्राने महाराजांनी टिका करणे, सत्यशोधक कार्यकर्त्यांवर खटले भरणे हे नित्याचेच झाले होत. संस्थानाच्या बाहेरील दंगली महाराजा नियंत्रणात आणू शकत नव्हते. त्यामुळे शाहू छत्रपतींनी आपण सत्यशोधक नाही आपला त्याचळवळीची काडीचाही संबंध नाही. असे वारंवार सांगण्याचा प्रयत्न केला.

### शाहू छत्रपतीचे सत्यशोधक समाजाची अतूट नाते -

आपण सत्यशोधक नाही असा जो बहाणा राजर्षी छत्रपती शाहू करतात. तो खरा मानून त्यांच्या सत्यशोधक समाजाशी संबंध नव्हता असे आग्रही मत माडणा-या अभ्यासकानी शाहू महाराजांच्या मृत्युनंतर त्यांच्या समकालीन पत्रकारांनी त्यांच्या वर लिहीलेले मृत्युलेख पहावेत. भगवंतराव पाळेकर 'जागृती ' पत्रकार लिहीतात, "सत्यशोधक समाजाच्या चळवळीचा डावा हात गळून पडला आणि अस्पृशांच्या खंडेराव बागल म्हणतात, 'शाहू महाराजांनी एका हातात सत्य समाज आणि दुस-या हातात समता ही निशाणी घेऊन सर्व महाराष्ट्रभर महात्मा फुले यांची तत्त्वे सर्वांसमोर माडली.' सत्यशोधक समाजामार्फत राजाराम महाराजांना जे मानपत्र देण्यात आले. तेव्हा शाहू महाराजांच्या अकीन निधनाने सत्यशोधक समाजाचे अपरिमित नुकसान झाले असे नमूद करण्यात आले. मानपत्रास उत्तर देताना राजाराम महाराज म्हणतात 'माया परम पुण्य पिताजींच्या प्रमाणे सत्यशोधक समाजाच्या कार्याला माझा पूर्ण पाठिंबा राहील. ' इतकेच नव्हेतर सत्यशोधक समाजाच्या कार्यास क्षात्रादगुरुची मदत असल्याबद्दल ते आनंदान समाधान व्यक्त करतात. शाहू छत्रपतींच्या मृत्युनंतर महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर पसरलेल्या सत्यशोधक समाजाच्या शाखांनी जे दुखवट्याचे ठरावे केले त्यामध्ये, 'आमचा दात गेला, आमचा वाली गेला, आम्ही पोरके झालो. ' असे उल्लेख आढळतात. महाराजांच्या मृत्युनंतर सत्यशोधक समाज किंवा इतर संस्थामार्फत महात्मा फुले आणि शाहू महाराज यांच्या पुण्यातिथी समारंभात जी भाषणे होतात त्यात महात्मा फुले यांचे कार्य महाराजांनी कसे पुढे चालविले यांच उल्लेख सापडतात. महाराजांचे समकालीन चितळीचे भाऊसाहेब पवार यांनी शाहू छत्रपतीचे चरित्र लिहून १९२९ साली प्रसिध्द केले त्यात ते म्हणतात. ' शाहू महाराज हे फुल्यांच्या सत्यशोधक

तत्त्वांचे पूर्ण अभिमानी होते त्यांना सत्यशोधक समाजाची तत्त्वे मान्य होती या तत्त्वांचा प्रसार त्यांनी संस्थानात फार जोराने केला. ' पंढरीनाथ सिताराम यांनीही आपल्या महात्मा फुले चरित्रात छत्रपती शाहू महाराजांनी जोतीरावांचे सत्यशाधेक विचारांचा प्रचार केल्याचे लिहितात. त्या काळातील कथा, कादंब-या, पोवाडे, नाटके, जलसे, लोकगीते इत्यादी मधून शाहू महाराजांचा उल्लेख सत्यशोधकी असाच होतो. शाहीर पिराजीराव सरनाईक यांनी आपल्या पोवाड्यात महात्मा फुले यांची सत्यशोधक चळवळ शाहू महाराजांनी जोमाने पुढे नेली असा गौरव करतात. महात्मा फुले यांच्या कार्यासंबंधीत शाहू छत्रपतींना फार आदर व अभिमान होता. त्यामुळे ते जोतीरावांच्या पुण्यातील घराचे स्मारक करु इच्छित होते. अशी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची आठवण आहे. १९२७ मध्ये सत्यशोधक समाज कोल्हापूर तर्फे महात्म गांधीजीना मानपत्र देण्यात आले त्यात म्हटले आहे, शाहू छत्रपतींनी सत्यशोधक चळवळीस प्रोत्साहन दिले. त्याच्याकृपेमुळेच या समाजास स्थायीपणा आला.

**निष्कर्ष -**

शाहू छत्रपती हे खरे सत्यशोधक होते. फुले - शाहू हा विग्रह नसून समासच आहे. फुले - शाहू आंबेडकर हा सामाजिक एकतेचा समास सांस्कृतिक कट कारस्थान करुन नष्ट करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**संदर्भग्रंथ सुची -**

१) छत्रपती शाहू आणि लोकमान्य टिळक : एक शोध --- डॉ. रमेश जाधव
२) राजर्षी शाहू छत्रपती : एक मागोवा --- डॉ. जयसिंगराव पवार
३) राजर्षी शाहू गौरव ग्रंथ : --- संपा.पी.बी. साळुंखे मुंबई
४) राजर्षी शाहू छत्रपती : सामाजिक क्रांतीकारक राज --- धनांय कीर
५) शाहू महाराजांच्या आठवणी : --- भाई माधवराव बागल
६) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ : --- संपा. डॉ. जयसिंगराव पवार कोल्हापूर
७) शाहू छत्रपतीचे निवडक आदेश : --- संपा भास्कर धाटावकर